दै. महाराष्ट्र टाईम्स, गुरूवार दि. ३० मे २०१९

स्मरण गोव्यातल्या मराठी संशोधकाचे

गोवा दफ्तरखान्याच्या प्रमुखपदी पोर्तुगीज सरकारने एका मराठी माणसाची नियुक्ती करावी, ही घटना १९३० मध्ये घडली. त्यांचे नाव ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर. यंदा पिसुर्लेकरांची १२५ वी जयंती आहे. त्यानिमित्त या उपेक्षित संशोधकाचे पैलू मराठी जनांसमोर आणणाऱ्या 'डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर स्मारक ग्रंथ' या ग्रंथांचे प्रकाशन आज, गुरुवारी (३० मे) शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते होत आहे. त्यानिमित्त...

अनिकेत यादव

निमित्त

स्वतंत्र स्वकीय आरमाराची उभारणी, हे छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेले क्रांतिकारी कार्य. या आरमाराचा अभ्यास करताना आपल्याला पदोपदी गोव्याचे ख्यातनाम संशोधक डॉ. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर यांनी पोर्तुगीज साधनांमधून समोर आणलेला इतिहास संदर्भ म्हणून महत्त्वाचा ठरतो. डॉ. पिसुर्लेकरांचे कार्य मात्र उपेक्षित आहे. ३० मे रोजी त्यांची १२५ वी जयंती आहे. ३० मे १८९४ या दिवशी गोव्यातल्या पिसुर्ले गावात त्यांचा जन्म झाला. शिक्षक आणि वकील म्हणून काम केल्यावर संशोधकाचा पिंड असल्याने त्यांनी गोवा पुरातत्त्व खात्यात १९२४ मध्ये काम करायला सुरुवात केली. बेताची परिस्थिती असतानाही 'कोणताही पगार मिळणार नाही', या बोलीवर ही नोकरी त्यांनी पत्करली. पुढे मासिक २९ रुपये पगार त्यांना मिळू लागला. त्यांच्या कामाची चिकाटी पाहून पोर्तुगीज सरकारने १९३० मध्ये त्यांना गोवा दफ्तरखान्याचे प्रमुख नेमले. पोर्तुगीज भारतात आल्यापासून म्हणजे १४९८ पासूनचे कागद या दफ्तरखान्यात होते. १९३० ते १९६१ अशी ३१ वर्षे पिसुर्लेकरांनी अक्षरशः समुद्रमंथनासारखे काम करून हा दफ्तरखाना सुसूत्र केला आणि या अभ्यासातून १२५ ग्रंथ आणि लेख असे प्रचंड लेखन केले. त्यांचा अर्धपुतळा उभारून पोर्तुगीज सरकारने त्यांच्या कार्याचे श्रेय त्यांना दिले. अर्ध्या तोळ्याची अंगठी आणि पोर्तुगालच्या लिस्बन विद्यापीठाने डी.लिट ही पदवी आणि पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. हा मराठी संशोधक डोंगराएवढे काम करूनही उपेक्षित राहिला.

पोर्तुगीज सरकारने त्यांना अधिक संशोधनासाठी राजधानी लिस्बन आणि पॅरिस इथे पाठविले. लिस्बनच्या ग्रंथालयात त्यांना अनेक दुर्मीळ साधने मिळाली. १७७६ मध्ये अनंत कामत वाघ यांनी हिंदू धर्मावर पोर्तुगीज भाषेत लिहिलेले पहिले पुस्तक, आद्य गोमंतकीय मराठी कवी कृष्णदास श्यामा यांनी लिहिलेले श्रीकृष्ण चरित्र, नकाशे, हस्तलिखिते त्यांनी पाहिली आणि यातली महत्त्वाची साधने सोबत आणली. 'शिवाजी महाराजांची धूर्तता, शौर्य, चपळाई आणि शहाणपणा पाहता त्यांची सीझरशी व अलेक्झांडरशी तुलना करता येईल' हा गोव्याचा व्हॉइसरॉय कोंदि-द-सां-विन्सेंट याने केलेला शिवछत्रपतींचा गौरव पिसुर्लेकरांच्या वाचनात आला, तेव्हा त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. 'कॉस्मो-दी-गार्द' याने पोर्तुगीज भाषेत लिहिलेले आणि लिस्बनमध्ये प्रसिद्ध झालेले पहिले शिवचरित्र त्यांनी तेथे पाहिले. तेव्हाच्या ३५० रुपयांना त्यांनी ते विकत घेतले. पिसुर्लेकरांचे लेखन हिंदुस्थान आणि पोर्तुगाल संबंधांवर असले, तरी त्याचा मूळ गाभा हा पोर्तुगीज आणि मराठे संबंध यावर आहे. राष्ट्रप्रेमाचा विचार कायम मनात ठेवून त्यांनी संशोधनकार्य केले. शिवछत्रपतींवरील कागदपत्रांचा अभ्यास करताना त्यांचा ऊर अभिमानाने भरून येई. ते म्हणत, 'शिवरायांना आणखी दहा वर्षांचे आयुष्य लाभले असते, तर गोवा सर्वप्रथम मुक्त झाला असता.' गोवा १९६१ मध्ये स्वतंत्र झाला. त्यांनी भारत सरकारकडे पाठविलेल्या पुराव्यांमुळे दादरा-नगर-हवेली हा प्रांत भारत सरकारकडे आला. गोवा प्रांत मराठी असल्याचे अनेक पुरावे देत. बेळगाव-कारवार हा प्रांतही मराठी असल्याचे त्यांनी ठासून सांगितले. पोर्तुगीज सरकारने दिलेली अर्ध्या तोळ्याची अंगठी त्यांनी गोवा मुक्ती संग्रामासाठी दान केली.

प्रसिद्धी, सन्मान आणि सत्कार हे संशोधकाचे शत्रू असतात हा विचार समोर ठेवून ते कायमच त्यापासून दूर राहिले. कॅन्सरमुळे १० जुलै १९६९ या दिवशी त्यांनी राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्याकडील दुर्मीळ ग्रंथ, नकाशे, हस्तलिखिते, मायक्रोफिल्म्स असा ४००० पेक्षा अधिक ग्रंथठेवा त्यांनी त्यांच्या हयातीतच मुंबई विद्यापीठाच्या पणजी केंद्राला दिला. सध्या तो गोवा विद्यापीठात आहे. 'कागदाचा एकही कपटा मी घरी ठेवला नाही. जे साहित्य मी जमवले त्याचा उपयोग नव्या पिढीने करावा' असे त्यांचे अखेरचे म्हणणे होते. त्यांच्या जन्मदिनानिमित्त पुणे विद्यापीठातर्फे 'पोर्तुगीज मराठे संबंध' या पिसुर्लेकरांच्या एकमेव मराठी पुस्तकाचे पुनर्प्रकाशन होत आहे. गोवा सरकार व पुराभिलेख विभागातर्फेही विविध उपक्रम आयोजिण्यात आले आहेत. त्याचसोबत 'डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर स्मारक ग्रंथ' प्रसिद्ध होत आहे. त्याचे तीन भाग असून त्यात पिसुर्लेकरांवरील चरित्रात्मक लेख, त्यांनी लिहिलेले लेख तसेच त्यांच्या १२५ ग्रंथ आणि लेखांचा सारांश आहे. महाराज शहाजीराजेंपासून ते पेशव्यांपर्यंतच्या कालखंडातली अप्रकाशित माहिती त्यांच्या साहित्यातून समोर येऊ शकेल. देशाच्या इतिहासासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घालणाऱ्या या द्रष्ट्या संशोधकाचे स्मरण ठेवणे आवश्यक आहे.

(लेखक इतिहास अभ्यासक आहेत)